ज्येष्ठ नेते माजी खासदार दत्ता मेघे यांचे निधन
>> पान 2

निसर्गोपचार आश्रमाचे शारीरिक-मानसिक आरोग्याबरोबरच ग्रामीण विकासातही मोलाचे योगदान- उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन
>> पान 3

डोणगांवमध्ये उत्साहात रमजान ईद साजरी
>> पान 4

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 223 ■ सोमवार, दि. 23 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

**सुविचार**

मनुष्य हा स्वभावत: एक राजकारणी प्राणी आहे. – ॲरिस्टॉटल




**सुर्य-चंद्र-आकाश-पाताळ आहे, तोपर्यंत भारतमातेच्या भुमिपुत्रांचे नाव अमर राहील**

आतील पान

## संक्षिप्त...

### लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार; भोंदू महाराजाला अटक



**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड शहरात लग्नाचे आमिष दाखवून एका महिलेवर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी भाग्यनगर पोलिसांनी मठातील महाराज असलेल्या आरोपीला अटक केली आहे.नांदेडमधील बाळगीर महाराज मठ येथे ४७ वर्षीय महिलेची ओळख ३८ वर्षीय संत हरीगीर दत्तगीर गिरी याच्याशी झाली. ओळखीचे रूपांतर पुढे प्रेमसंबंधात झाले आणि त्यातून दोघांमध्ये जवळीक वाढली. या दरम्यान आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार केल्याचा आरोप आहे. मात्र पुढे आरोपीने लग्नास नकार दिल्यानंतर आपली फसवणूक झाल्याची जाणीव पीडित महिलेला झाली. यानंतर महिलेने भाग्यनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी गुन्हा नोंदवत आरोपीला अटक केली आहे. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### भारत इनोव्हेट्स मधून जागतिक नवोन्मेष केंद्र म्हणून भारताचा होत असलेला उदय प्रतिबिंबित होतो

**मुंबई/प्रतिनिधी :** या प्री-समिटच्या निमित्ताने, केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या एका गोलमेज परिषदेत सुमारे १७५ गुंतवणूकदार आणि उद्योगपती सहभागी झाले होते. प्रधान यांनी ऊर्जा, हवामान आणि शाश्वतता, सेमीकंडक्टर, अंतराळ आणि संरक्षण, आरोग्यसेवा आणि मेडटेक, प्रगत संगणन, जैवतंत्रज्ञान, मोबिलिटी आणि स्मार्ट शहरे तसेच इंडस्ट्री ४.० यांसारख्या विविध क्षेत्रांतील नवोन्मेषकांशी संवाद साधला. तसेच, प्रदर्शन स्टॉल्स आणि आयआयटी बॉम्बेच्या पॅव्हेलियनलमध्ये प्रदर्शित करण्यात आलेल्या संस्थात्मक नवोन्मेष दर्शविणाऱ्या अत्याधुनिक, संशोधन-आधारित उपाययोजनांचे अवलोकन केले.

हा समारोप सोहळा आयआयटी बॉम्बेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. के. राधाकृष्णन; उच्च शिक्षण विभागाचे सचिव डॉ. विनीत जोशी; विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सचिव प्रा. अभय करंदीकर; आणि आयआयटी बॉम्बेचे संचालक प्रा. शिरीष केदारे यांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमाला प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ, प्रतिष्ठित शास्त्रज्ञ, उद्योगपती, नवोन्मेषक, नवउद्योजक तसेच शिक्षण मंत्रालय आणि आयआयटी मुंबईमधील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या पूर्व परिषदेतल्या चर्चेत सहभागी होण्याचा आनंद व्यक्त करताना ते म्हणाले की, फ्रान्समधील नीस येथे आयोजित होणाऱ्या 'भारत इनोव्हेट्स २०२६' ची पूर्वतयारी म्हणून, या विचारमंथन सत्रात डीप-टेक नवोन्मेषाला चालना देणे, उद्योग-शैक्षणिक संस्था भागीदारी मजबूत करणे आणि स्टार्टअप परिसंस्थेला बळकट करणे यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. उदयोन्मुख उद्योगांमध्ये सातत्यपूर्ण गुंतवणुकीच्या गरजेवर भर त्यांनी दिला.





# भारतासह मित्र राष्ट्रांना होर्मुझ खुली!

## इराणच्या निर्णयामुळे देशातील संभाव्य ऊर्जा संकट टळणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढील ४८ तासांत होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे खुली न केल्यास इराणच्या वीज प्रकल्पांना लक्ष्य करण्याची धमकी दिली होती. या इशाऱ्यानंतर काही तासांतच इराणने आपली भूमिका मवाळ केली आहे.भारतासह मित्र राष्ट्रांना हा जलमार्ग खुला राहील, असे इराणच्या वरिष्ठ प्रतिनिधीने स्पष्ट केले आहे. मात्र, शत्रू देशांच्या (प्रामुख्याने अमेरिका आणि इस्रायल) जहाजांना या मार्गातून जाण्याची परवानी नाकारली आहे.

या निर्णयामुळे भारताला मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. सध्या भारताची सुमारे २२ जहाजे होर्मुझ सामुद्रधुनी परिसरात अडकलेली आहेत. भारत सरकारकडून इराणशी सतत संपर्क ठेवला जात असून, इराणच्या या निर्णयाने भारतीय जहाजांना मार्ग मिळण्याची शक्यता वाढली आहे. जर ५ भारतीय जहाजांना या मार्गाने जाण्याची परवानगी मिळाली, तर देशातील संभाव्य ऊर्जा संकट टाळता येऊ शकते.



आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेतील (आयएमओ) इराणचे प्रतिनिधी अली मौसावी यांनी रविवारी सांगितले की, ज्या जहाजांचा इराणच्या शत्रूंशी संबंध नाही, ती जहाजे तेहरानसोबत सुरक्षा आणि सुरक्षिततेबाबत समन्वय साधून होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करू शकतात.

इराण या आखाती क्षेत्रात सागरी सुरक्षा सुधारण्यासाठी आणि खलाशांच्या संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्रांच्या संस्थेसोबत सहकार्य करण्यास तयार आहे.

मात्र, सध्या होर्मुझच्या समुद्रधुनीत निर्माण झालेल्या तणावासाठी इस्रायल आणि अमेरिकेचे इराणवरील हल्लेच कारणीभूत असल्याचा दावा त्यांनी केला. मुत्सद्देगिरी हेच इराणचे प्राधान्य आहे. मात्र, आक्रमकता पूर्णपणे थांबवणे तसेच परस्पर विश्वास आणि खात्री असणे अधिक महत्त्वाचे आहे असे मौसावी यांनी नमूद केले.

दरम्यान, अमेरिकेने या मार्गावरून जाणाऱ्या जहाजांना संरक्षण देण्यासाठी नौदल युती करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु बहुतांश नाटो मित्र राष्ट्रांनी इराणविरुद्धच्या लष्करी कारवाईत सहभागी होण्यास नकार दिला आहे.

## महाराष्ट्र केसरी विजेत्या हर्षवर्धन सदगीरचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून अभिनंदन

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्र केसरीच्या स्पर्धेत हर्षवर्धन सदगीर यांनी आपल्या जिद्द, ताकद आणि कौशल्याच्या जोरावर महाराष्ट्र केसरीच्या विजेतेपदावर आपले नाव कोरले आहे. तर उपविजेता महेंद्र गायकवाड यांनीही तितक्याच दमदार कामगिरीतून कुस्ती रसिकांची मने जिंकली आहेत, असे गौरवोद्गार काढत या स्पर्धेतील विजेते हर्षवर्धन सदगीर आणि उपविजेते महेंद्र गायकवाड यांचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी अभिनंदन केले आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आपल्या संदेशात म्हणतात की, वाघोली येथे पार पडलेल्या ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या अंतिम लढतीत प्रेक्षकांना श्वास रोखून धरायला लावणारा थरार अनुभवायला मिळाला. गादी विभागातील विजेता हर्षवर्धन सदगीर आणि माती विभागातील विजेता महेंद्र गायकवाड यांच्यात झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात हर्षवर्धन सदगीर यांनी दमदार खेळ करत मानाची महाराष्ट्र केसरी गदा पटकावली. अंतिम सामन्यातील हर्षवर्धन सदगीर आणि महेंद्र गायकवाड यांची झुंज ही खऱ्या अर्थाने कुस्ती परंपरेची मान उंचावणारी ठरली. कुस्ती हा महाराष्ट्राच्या मातीत रुजलेला, परंपरेचा ठेवा असलेला रांगडा क्रीडाप्रकार आहे,



कुस्तीच्या माध्यमातूनच पै. खाशाबा जाधव यांनी भारताला पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक मिळवून दिले. ही परंपरा पुढे नेण्याचे काम आजचे तरुण पैलवान करत आहेत, ही अभिमानास्पद बाब आहे.

वाघोली येथे पार पडलेल्या महाराष्ट्र केसरीच्या स्पर्धेत अनेक रोमांचक आणि चुरशीचे सामने रंगले. भव्य आणि उत्कृष्ट नियोजनामुळे स्पर्धेला विशेष उठाव प्राप्त झाला. या स्पर्धेतील विजेत्या-उपविजेत्यांचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## हर्षवर्धन सदगीर बनला 'डबल महाराष्ट्र केसरी', बाहुबली महेंद्र गायकवाडला आस्मान दाखवले

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्याच्या वाघोली येथे रामकृष्ण सातव पाटील यांच्या वतीने आयोजित ६८ व्या महाराष्ट्र केसरी २०२६ स्पर्धेत नाशिकचा हर्षवर्धन सदगीर हा डबल महाराष्ट्र केसरी बनला आहे.त्याने फायनल सामन्यात सोलापूरचा 'बाहुबली' महेंद्र गायकवाडचा ४-३ ने पराभव केला आहे. तर विजयी ठरलेल्या नाशिकचा हर्षवर्धन सदगीरला चांदीची गदा आणि पुरस्कार हा कृषी मंत्री दत्ता मामा भरणे आणि मंत्री दादा भुसे यांच्या हस्ते देण्यात आला आहे.

महाराष्ट्र केसरीच्या फायनल सामन्यात 'बाहुबली' महेंद्र गायकवाडने पहिल्या मिनिटालाचा आक्रामक सुरुवात केली होती. तर अनुभवी हर्षवर्धन सदगीर संयमी खेळीने सूरूवात केली होती. यावेळी हर्षवर्धनला बाहेर केल्याने महेंद्रला एक गुण मिळाला होता. त्यानंतर महेंद्र गायकवाडचा दुहेरी पटाचा प्रयत्न हर्षवर्धन सदगीनरने धुडकावून लावला होता. त्यानंतर हर्षवर्धन सदगीरला एक गुण देण्यात आला होता. कारण महेंद्रला ताकीद देऊन ही तसाच खेळ खेळत होता.शेवटी ३ मिनिटाच्या खेळानंतर सामना १-१ बरोबरीत होता.

सोलापूरचा 'बाहुबली' महेंद्र गायकवाडने हिंगोलीचा 'चपळ चिता' सिकंदर शेख या दोन्ही दोन्ही मल्लांनी पहिल्या मिनिटापासून आक्रामक सूरूवात केली होती. यावेळी 'बाहुबली' महेंद्र सिकंदर शेखने ताबा मिळवत दोन गुण मिळवले होते. त्यानंतर स्टेपआऊट करून महेंद्र गायकवाडला एक गुण पटकावून ३ गुणांची आघाडी घेतली होती. त्यामुळे पहिल्या फेरीत महेंद्र गायकवाड ३ गुण सिकंदर शेख शुन्य गुणावर होता.

त्यानंतर महेंद्र गायकवाडला ॲक्टीव्हीटी पिरियडचा टाईम देण्यात आला होता. पण ॲक्टीव्हीटी पिरियडमध्ये महेंद्र गायकवाडला गुण घेता आला नाही, त्यामुळे हर्षवर्धनच्या खात्यात एक गुण आला. अशाप्रकारे त्याची दोन गुणांची आघाडी झाली.त्यानंतर पुन्हा एक डाव टाकत हर्षवर्धन सदगीरने दोन गुण पटकावले आणि ४ गुणांची आघाडी घेतली. त्यानंतर शेवटच्या क्षणी महेंद्र गायकवाड हा आक्रामक होताना दिसला होता. शेवटी स्टेप आऊटचा महिंद्राने एक गुण मिळवला. पण त्याचा काहीच फायदा झाला नाही. आणि हर्षवर्धन सदगीरने ४-३ अशा फरकाने सामना जिंकत डबल महाराष्ट्र केसरी होण्याचा मान पटकावला.

दुसऱ्या फेरीत सिकंदर शेखने गुण मिळवण्याचा प्रयत्न केला. पण बाहुबली असलेल्या महेद्र गायकवाडने सिकंदरला दोन्ही फेऱ्यात एक गुण घेऊ दिला नाही. आणि शेवटी 'बाहुबली' महेंद्र गायकवाडने हिंगोलीच्या सिकंदर शेख ३-० असा पराभव केला होता. या विजयासह महेद्र गायकवाड माती विभागातून फायनलला पोहोचला होता.

# राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२६ : 'महिला रत्न' पुरस्काराने डॉ. प्रांजली बाजड यांचा गौरव

## पती-पत्नींच्या आरोग्यसेवेचा आदर्श ठरला प्रवास

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** समाजासाठी समर्पित आरोग्यसेवेचा उल्लेखनीय आदर्श निर्माण करत ओम हॉस्पिटल व प्रसुती गृहच्या माध्यमातून गेल्या १६ वर्षांपासून निस्वार्थ सेवा देणाऱ्या डॉ. प्रांजली शिवाजी बाजड यांना 'महिला रत्न' या प्रतिष्ठेच्या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नैसर्गिक मानवअधिकार सुरक्षा परिषद फोरमच्या वतीने धुळे येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा२०२६ मध्ये हा सन्मान प्रदान करण्यात आला.

डॉ. प्रांजली बाजड यांनी ग्रामीण आणि शहरी भागातील रुग्णांना दर्जेदार व परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध करून देत समाजात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. विशेषतः महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे, सुरक्षित प्रसूती सेवा आणि आपत्कालीन वैद्यकीय मदत




यामध्ये त्यांनी मोलाचे कार्य केले आहे. त्यांच्या कार्यात संवेदनशीलता, कर्तव्यभावना आणि व्यावसायिक प्रामाणिकपणाचा सुंदर संगम दिसून येतो. या यशामागे त्यांच्या पती डॉ. शिवाजी बाजड यांचेही तितकेच महत्त्वपूर्ण योगदान आहे. दोघेही पती-पत्नी



एकत्रितपणे आरोग्यसेवेचे व्रत जपत रुग्णांची सेवा करत आहेत. त्यांच्या समन्वयातून उभा राहिलेला हा सेवाभाव अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

कुटुंब, समाज आणि व्यवसाय यांचा समतोल साधत त्यांनी आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य उभारले आहे.

हा पुरस्कार मा. श्री. गोरख दिलीप देवरे (राष्ट्रीय अध्यक्ष/महासंचालक), सौ. मंजुळाताई गावित (आमदार, साक्री विधानसभा) तसेच दादासो. श्री. वासुदेवजी देसले (डी.वाय.एस.पी., नाशिक) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी विविध क्षेत्रातील



मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

डॉ. प्रांजली बाजड यांच्या या सन्मानामुळे बुलढाणा जिल्हा सह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. आरोग्यसेवेत समर्पण, निष्ठा आणि सेवाभाव ठेवला तर यशाचे शिखर गाठता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे डॉ. प्रांजली आणि डॉ. शिवाजी बाजड हे दाम्पत्य ठरले आहे.

## न्यायव्यवस्थेने दाखवलेली संवेदनशीलता

कोविड प्रतिबंधक लसीकरणानंतर उद्भवलेल्या गंभीर दुष्परिणामांमुळे प्राण गमावलेल्या तसेच गंभीर आजारी पडलेल्या नागरिकांच्या वारसांना दिलासा देणारा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. कोविड प्रतिबंधक लसीकरणानंतर उद्भवलेल्या गंभीर दुष्परिणामांमुळे प्राण गमावलेल्या किंवा आजारी पडलेल्या नागरिकांच्या वारसांना दिलासा देणारा एक अत्यंत महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारला यासंदर्भात 'नो फॉल्ट' म्हणजेच 'विनादोष भरपाई' धोरण तातडीने तयार करण्याचे आदेश दिले आहेत. हा निर्णय राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या जगण्याच्या आणि आरोग्याच्या अधिकाराचे रक्षण करणारा आहे. महामारीच्या काळात राबवण्यात आलेली लसीकरण मोहीम ही सार्वजनिक हितासाठी होती, परंतु या मोहिमेदरम्यान ज्या अनेक व्यक्तींना गंभीर शारीरिक समस्यांचा सामना करावा लागला, त्यांच्याप्रती राज्याची असलेली जबाबदारी न्यायालयाने या निकालातून अधोरेखित केली आहे. यानिमित्ताने 'नो फॉल्ट' भरपाई धोरण म्हणजे नेमके काय, हे समजून घेणे आवश्यक आहे. सामान्यतः कोणत्याही नुकसानभरपाईच्या दाव्यामध्ये पीडित व्यक्तीला समोरच्या पक्षाची चूक किंवा निष्काळजीपणा सिद्ध करावा लागतो. मात्र, लसीकरणासारख्या जटिल वैज्ञानिक प्रक्रियेत अशा प्रकारचा निष्काळजीपणा सिद्ध करणे सामान्य नागरिकासाठी अत्यंत कठीण असते. नो फॉल्ट धोरणामुळे पीडित कुटुंबाला कोणाचीही चूक सिद्ध करण्याची गरज उरणार नाही. जर एखाद्या व्यक्तीचा मृत्यू किंवा गंभीर आजार हा लसीकरणाच्या दुष्परिणामामुळे झाला असेल, तर सरकारला नैतिक आणि कायदेशीररीत्या त्यांना मदत करावी लागेल. यामुळे पीडित कुटुंबांचा न्यायालयीन फेऱ्यांमधील वेळ आणि पैसा वाचणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, नागरिकांना दिवाणी न्यायालयांमध्ये दाद मागण्यासाठी मजबूर करणे हे त्यांच्यावर अतिरिक्त ओझे टाकण्यासारखे आहे, जे अन्यायाचे ठरेल. या याचिकेच्या मुळाशी २०२१ मधील काही हृदयद्रावक घटना आहेत. कोविशील्ड आणि कोव्हॅक्सिन यांसारख्या लसी घेतल्यानंतर काही तरुणांना रक्ताच्या गाठी होण्यासारख्या गंभीर समस्या उद्भवल्या आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पालकांनी आणि जोडीदारांनी न्यायालयात धाव घेतली होती. केंद्र सरकारने असा युक्तिवाद केला होता की, लसीकरणाचे दुष्परिणाम अत्यंत दुर्मिळ आहेत आणि १० लाख डोसेसमागे केवळ ०.००१ इतकेच त्याचे प्रमाण आहे. मात्र, न्यायालयाने असा दृष्टिकोन मांडला की, जरी हे प्रमाण कमी असले तरी ज्या कुटुंबांनी आपला माणूस गमावला आहे, त्यांच्यासाठी ही आकडेवारी गौण आहे. सार्वजनिक आरोग्य मोहिमेत सहभागी होताना जर एखाद्या नागरिकाचे नुकसान होत असेल, तर राज्य त्याकडे मूक प्रेक्षक म्हणून पाहू शकत नाही. लोककल्याणकारी राज्यामध्ये नागरिकांच्या आरोग्याची आणि हिताची जबाबदारी शासनाचीच असते. आरोग्य आणि लसीकरण या विषयात माहितीपूर्ण संमती अत्यंत महत्त्वाची असते. याचिकाकर्त्यांनी असा मुद्दा उपस्थित केला होता की, सरकारने लसीच्या संभाव्य धोक्यांविषयी पुरेशी पारदर्शकता ठेवली नाही. जरी लसीकरण अधिकृतपणे ऐच्छिक होते, तरीही प्रशासकीय निर्बंधांमुळे ते अनिवार्य झाले होते. न्यायालयाने यावर भाष्य करताना म्हटले की, कलम २१ अंतर्गत प्रत्येक नागरिकाला आपल्या शरीराच्या अखंडतेचा अधिकार आहे आणि कोणावरही सक्ती केली जाऊ शकत नाही. मात्र, एकदा का सार्वजनिक आरोग्यासाठी लसीकरण मोहीम राबवली गेली, की त्यातून उद्भवणाऱ्या जोखमीची जबाबदारीही यंत्रणेला घ्यावी लागते. ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंगडम आणि जपान यांसारख्या प्रगत देशांमध्ये अशी भरपाई धोरणे आधीच अस्तित्वात आहेत, ज्याचा उल्लेख न्यायालयाने आपल्या निकालात केला आहे. सरकारने सुरुवातीला असे सुचवले होते की, पीडित कुटुंबे नुकसानभरपाईसाठी लस उत्पादक कंपन्यांविरुद्ध खटले भरू शकतात. परंतु न्यायालयाने हा तर्क फेटाळून लावला. लस उत्पादक कंपन्यांविरुद्धची कायदेशीर लढाई ही तांत्रिक आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक असते. अशा प्रकरणांमध्ये वैज्ञानिक पुरावे गोळा करणे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरचे असते. जर वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळ्या न्यायालयांनी यावर वेगवेगळे निकाल दिले, तर त्यामुळे समानतेच्या तत्त्वाचे उल्लंघन होईल. म्हणूनच केंद्राने एक देशव्यापी आणि एकसमान धोरण तयार करणे गरजेचे आहे, जेणेकरून सर्वांना समान न्याय मिळेल. न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले की, ही भरपाई देणे म्हणजे सरकारने आपली चूक मान्य केली आहे असा त्याचा अर्थ होत नाही, तर ही एक सामाजिक सुरक्षा यंत्रणा आहे. हा निकाल देताना न्यायालयाने २०२१ मधील गौरव कुमार बन्सल विरुद्ध भारत सरकार या खटल्याचा संदर्भ दिला, ज्यामध्ये कोविडमुळे मृत्यू पावलेल्यांच्या वारसांना ५० हजार रुपयांची मदत देण्याचे आदेश दिले गेले होते. आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत मिळणारी ही मदत हा नागरिकांचा वैधानिक हक्क असल्याचे न्यायालयाने तेव्हा म्हटले होते. आता लसीकरणाच्या दुष्परिणामांबाबतही तसाच संवेदनशील दृष्टिकोन ठेवण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाला हे धोरण लवकरात लवकर प्रसिद्ध करण्यास सांगण्यात आले आहे. या धोरणामुळे ज्यांनी लसीकरण मोहिमेला साथ देताना आपल्या प्रिय व्यक्तींना गमावले आहे अशा हजारो कुटुंबांना दिलासा मिळाला आहे. एकूणच, सर्वोच्च न्यायालयाचा हा ऐतिहासिक निर्णय मानवाधिकार आणि सार्वजनिक धोरण यांच्यातील समतोल साधणारा आहे. विज्ञानाच्या प्रगतीमध्ये मानवी जीवनाचे मूल्य कमी होऊ नये, याची काळजी या निकालाने घेतली आहे. भविष्यातील कोणत्याही सार्वजनिक आरोग्य आणीबाणीच्या काळात अशा प्रकारची धोरणे नागरिकांचा यंत्रणेवरचा विश्वास वाढवण्यास मदत करतील. सरकार आता हे धोरण कशा प्रकारे लागू करते आणि मदतीची रक्कम किती निश्चित करते, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष आहे. न्यायव्यवस्थेने दाखवलेली ही संवेदनशीलता भारतीय लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अत्यंत आश्वासक आहे.

# ज्येष्ठ नेते माजी खासदार दत्ता मेघे यांचे निधन

## ८९ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास, विदर्भातील प्रभावी व दूरदृष्टीचे नेते म्हणून ओळख



**दैनिक आपला विदर्भ**

**वर्धा/प्रतिनिधी :** विदर्भातील ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार दत्ता राघोबाजी मेघे (वय ८९) यांचे रविवारी दिनांक २२ मार्च रोजी नागपूर येथील निवासस्थानी निधन झाले. त्यांच्या निधनाने विदर्भाच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.

दत्ताजी मेघे हे विदर्भातील प्रभावी व दूरदृष्टीचे नेते म्हणून ओळखले जात होते. त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत लोकसभा खासदार म्हणून जनतेचे प्रतिनिधित्व केले. ग्रामीण भागाच्या विकासासाठी, विशेषतः शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सावंगी मेघे येथे भव्य रुग्णालयाची स्थापना केली. त्यांच्या कार्यकाळात विदर्भातील अनेक विकासकामांना गती मिळाली.

राजकारणाबरोबरच सामाजिक क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान होते. त्यांनी शिक्षण संस्थांची उभारणी करून ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या अनेक शैक्षणिक व वैद्यकीय संस्था आजही समाजसेवेचे कार्य करत आहेत. त्यामुळे ते केवळ राजकारणी नव्हे, तर समाजसेवक म्हणूनही जनमानसात लोकप्रिय होते.

दत्ता मेघे यांचा स्वभाव साधा, लोकाभिमुख आणि कार्यपद्धती पारदर्शक होती. सामान्य नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर त्वरित उपाययोजना करण्यासाठी ते ओळखले जात. त्यामुळे त्यांना सर्वपक्षीय आदर लाभला होता. त्यांच्या पश्चात कुटुंबीयांसह मोठा राजकीय व सामाजिक वारसा आहे. त्यांच्या निधनाने विदर्भाने एक अनुभवी, अभ्यासू आणि जनतेशी नाळ जुळलेला नेता गमावला आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल, अशा भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहेत.

शेवटचा ठरला पाडवा पहाट

माजी खासदार दत्ता मेघे यांनी नववर्षाच्या स्वागतार्ह वर्ध्यातील सोशालिस्ट चौक येथे आयोजित पाडवा पहाट कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली होती आणि तीच उपस्थिती त्यांची शेवटची ठरली. तब्बल तीन तास त्यांनी संगीतमय कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मेघे कुटुंबियांचे केले सांत्वन

### दत्ताभाऊ मेघे यांच्या निधनाने शोककळा

**नागपूर/प्रतिनिधी :** ज्येष्ठ नेते व माजी मंत्री दत्ताभाऊ मेघे यांच्या निधनाचे वृत्त समजताच विदर्भात शोककळा पसरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांनी आपले सर्व नियोजित कार्यक्रम रद्द करून नागपूरमधील खामला येथील मेघे निवासस्थानी जाऊन दत्ताभाऊ मेघे यांचे अंत्यदर्शन घेत श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, आमदार चरणसिंह ठाकूर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.





दत्ताभाऊ मेघे यांनी शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात भरीव कामगिरी करत ग्रामीण भागात शैक्षणिक संस्थांचे मोठे जाळे उभे केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध झाल्या. सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून आयुष्यभर समाजासाठी कार्य करणाऱ्या या लोकनेत्याच्या निधनाने मोठी हानी झाल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

# सुर्य-चंद्र-आकाश-पाताळ आहे, तोपर्यंत भारतमातेच्या भुमिपुत्रांचे नाव अमर राहील

आज शहीदांच्या पुंण्यायीनेच देशाची १४० कोटी जनता खुला स्वास घेत आहे. अनेक क्रांतिकारक,थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने,प्रयत्नाने व बलिदानाने १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल १९४७ ला प्रज्वलीत केली.१९२८ ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले.त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी पुढाकार घेऊन ''सायमन परत जा''च्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला.ही बाब सायमन कमिशनचे अधिकारी सँडर्स यांना पचली नाही.लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले.यामुळे सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली. जमाव पांगवण्यासाठी सँडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला.यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच १७ डिसेंबर १९२८ ला त्यांचा अंत झाला.त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारतात शोककळा पसरली. हे दु:ख भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना पाहवले नाही. त्यामुळे क्रांतिकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी दृढनिश्चय करून व्युहरचना तयार केली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा इंग्रज अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याचे ठरविले.लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी भगतसिंग,राजगुरू आणि सुखदेव हे तिघेही वेष बदलुन सँडर्स यांच्या निवासस्थानी गेले.सँडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले. संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सँडर्सला जागीच ठार केले व तेथुन पलायन केले.यामुळे इंग्रज आगबबुला झाले व इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.बरेच दिवस इंग्रजांना हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले. परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले. शेवटी २३ मार्च १९३१ ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली. यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा पसरली.भारत स्वतंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या



तिन्ही सुपुत्रांना कोन्हीही कधीही विसरणार नाही.''जो पर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोणीही विसरणार नाही''. भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव यांचे बलीदान पाहून १४० कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते.परंतु ९५ टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते.कारण ९५ टक्के राजकीय पुढारी आज देशसेवा, सामाजिक सेवा व देशांच्या विकासापेक्षा स्वत:च्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात.राजकीय पुढाऱ्यांनो याद राखा जोपर्यंत तुम्ही देशाच्या विकासासाठी, जनतेच्या हितासाठी, गोरगरिबांच्या कल्याणासाठी संपूर्णपणे ताकद लावणार नाही तोपर्यंत शहिदांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही व त्यांना राजकीय दृष्ट्या खरी श्रद्धांजली म्हणता येणार नाही. क्रांतिकारक,शहिद हसत-हसत फासावर का चढले यामागचा त्यांचा एकच उद्देश होता.तो म्हणजे मातृ भुमिची रक्षा करून सर्वसामान्यांना न्याय मिळावा व भारत स्वतंत्र होवून सुख शांती निर्माण व्हावी आणि देश सुजलाम सुफलाम व्हावा.परंतु आजचा राजकीय पुढारी असा झाला आहे की ''लोका सांगे ग्याण व स्वत: कोरडे पाषाण'' यामुळेच या कृषी प्रधान देशात मुठभर राजकीय पुढारी भ्रष्टाचाराच्या मार्गाने करोडपती झाल्याचे दिसून येतात व करोडपती शेतकरी शुन्य झालेला दिसुन येतो.कारण आजचा राजकीय पुढारी पाच वर्षासाठी लोकप्रतिनिधी बनतो खरा परंतु पाच वर्षाच्या काळात करोडपती बनतो ही कसली देश सेवा,कसली देश भक्ती म्हणावी!भारतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब, सर्वसामान्य,शेतकरी हा गरीबीच्या खाईत जात आहे.या संपूर्ण बाबींची जान राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांची शहीदांना खरी श्रद्धांजली समजल्या जाईल.राजकीय पुढाऱ्यांना कोणत्याही लढाईवर जाण्याची गरज नाही.फक्त शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी या पदाला कलंकित न करता यांचा योग्य उपयोग करून जनसेवा व लोककल्याणाची कामे केली पाहिजे. तेंव्हाच शहिदांना खरी श्रद्धांजली ठरेल व शहिदांच्या आत्म्याला शांती मिळेल.संपुर्ण देश शहिद दिनाला शहिदांना आपली आदरांजली अर्पण करीत आहे.परंतु शहिदांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची जाण मुख्यत्वेकरुन राजकीय पुढाऱ्यांनी ठेवण्याची गरज आहे.राजकीय पुढाऱ्यांनो थोडे ७९ वर्षे मागे वळून पहा व क्रांतिकारकांना देश स्वातंत्र्यासाठी कायकाय यातना भोगाव्या लागल्यात याचे अनुकरण करून चिंतन करा आणि त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून समाजसेवा करण्याची तत्परता दाखवा. कारण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष देशसेवेपेक्षा फक्त स्वतःचे हीत साधण्याचा प्रयत्न जास्त असतो.दिनांक १९ मार्च २०२५ बुधवारला अनेक वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या माहितीनुसार जाहीर केलेल्या एका स्वयंसेवी संस्था असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉम्सच्या (एडीआर) अहवालात असे दिसून आले की देशातील ४५ टक्के आमदारांवर गुन्हेगारीचे खटले दाखल आहेत ही स्वतंत्र भारतासाठी दुःखद व धक्कादायक बाब आहे.यांना कसले लोकप्रतिनिधी म्हणावेत हाही प्रश्न उपस्थित होतो.त्यामुळे यावर अंकुश लावने अत्यंत गरजेचे आहे.करीता सावधान राजकीय पुढाऱ्यांनो कोणतेही कार्य करतांना शहिदांचे अनुकरण अवश्य करावे व त्यांच्या बलीदानाला कोठेही ठेच किंवा तडा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी. शहिद दिनाच्या निमित्ताने देशवासीयांना हेच सांगु इच्छितो की बदलत्या हवामानामुळे व युद्धजन्य परिस्थितीमुळे देशातील वाढते प्रदुषण धोकादायक स्थितीत येवून ठेपले आहे आणि प्रदूषणाच्या बाबतीत जगामध्ये भारताचा तिसरा क्रमांक लागतो.याकरीता शहिद दिनाचे औचित्य साधून राजकीय पुढारी, सामाजिक संघटना व सर्वसामान्य नागरिकांनी आपल्यापरीने वृक्षारोपण करून जास्तीत जास्त वृक्षलागवड करण्याचा संकल्प केला पाहिजे हीच शहिदांना खरी श्रद्धांजली ठरेल व हे वृक्ष अनंत काळापर्यंत आपल्या स्मरणात राहील आणि शहिदांचे स्मरण आपल्याला प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात,फळात दिसुन येईल.हे भारत मातेच्या शहिद भुमि पुत्रांनो माझा कोटी कोटी प्रणाम ''जब तक सुरज चांद रहेंगा तबतक शहिदोंका नाम रहेंगा''जय हिंद! जय भारत.



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## ज्येष्ठ नेते दत्ताजी मेघे यांच्या निधनाने विदर्भाच्या शैक्षणिक, सामाजिक क्षेत्राची हानी - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

**मुंबई/प्रतिनिधी :** ज्येष्ठ नेते, माजी मंत्री आणि माजी खासदार दत्ताजी मेघे यांच्या निधनामुळे विदर्भाच्या शैक्षणिक, सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत दत्ता मेघे यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, ''दत्ताजी मेघे यांनी विदर्भाच्या विकासासाठी, विशेषतः शिक्षण आणि वैद्यकीय क्षेत्रात दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांनी उभ्या केलेल्या शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून हजारो ग्रामीण विद्यार्थ्यांना ज्ञानाची दारे खुली झाली. एक अनुभवी संसदपटू आणि संवेदनशील समाजसेवक म्हणून त्यांचे कार्य सदैव स्मरणात राहील.त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राने एक दिग्गज नेता गमावला आहे. त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दत्ताजी मेघे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## कोल्हापूर जिल्हास्तरीय धान्य महोत्सवास ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने आयोजित दोन दिवसीय 'जिल्हास्तरीय धान्य महोत्सवाचा' आज अत्यंत उत्साहात समारोप झाला. राजारामपुरी येथील व्ही. टी. पाटील स्मृती सदन येथे २१ व २२ मार्च रोजी संपन्न झालेल्या या महोत्सवात कोल्हापूरकरांनी खरेदीचा विक्रमी उत्साह दाखवला असून, २ दिवसात १ कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या शेतमालाची थेट विक्री झाली आहे.

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला दर्जेदार शेतीमाल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवून त्यांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणे, हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश होता. कोल्हापूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक श्री. बसवराज मास्तोळी यांच्या हस्ते या महोत्सवाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. जालिंदर पांगरे, कृषी उपसंचालक श्री. नामदेव परीट, उपविभागीय कृषी अधिकारी श्री. अरुण भिंगारदेवे , श्री. किरण पाटील,श्री पोपट पाटील यांसह कृषी विभागातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकरी व ग्राहकांकडून उपक्रमाचे स्वागत

या उपक्रमाबाबत दोन्ही घटकांकडून अत्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळाला. मध्यस्थांची साखळी म ोडीत निघाल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळाला. थेट ग्राहकांशी संवाद साधल्यामुळे बाजारपेठेतील मागणीचा कल समजण्यास मदत झाली असे मत सहभागी शेतकरी उत्पादक कंपन्यांनी व्यक्त केले. कृषी विभागा कडून उच्च दर्जाचा सेंद्रिय शेतीमाल, विशेषतः आजरा घनसाळ तांदूळ, सेंद्रिय गूळ आणि पौष्टिक तृणधान्ये रास्त दरात उपलब्ध करून दिल्यामुळे अशा महोत्सवांमुळे शुद्ध अन्नाची खात्री मिळते अशा प्रतिक्रिया ग्राहकांनी नोंदवल्या.

विक्रमी आर्थिक उलाढाल: एकूण ६० स्टॉल्सच्या माध्यमातून विविध कडधान्ये, फळे आणि प्रक्रियायुक्त पदार्थांची मोठ्या प्रमाणात विक्री झाली.

मिलेट रॅली व जनजागृती: 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' निमित्त आज सकाळी कृषी विभागाच्या महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काढलेल्या 'मिलेट रॅली'द्वारे पौष्टिक आहाराचा संदेश शहरात पोहोचवण्यात आला. शाश्वत शेतीला प्रोत्साहन: सेंद्रिय व नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या मालाला ग्राहकांनी विशेष पसंती दिली, ज्यामुळे शाश्वत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे मनोबल उंचावले आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. जालिंदर पांगरे यांनी महोत्सवाच्या यशस्वीतेबद्दल समाधान व्यक्त करताना सांगितले की, कोल्हापूरकरांनी दिलेला हा प्रतिसाद शेतकऱ्यांना बळकटी देणारा आहे. भविष्यातही अशा प्रकारचे थेट विपणनाचे उपक्रम राबवून शेतकरी व ग्राहक यांच्यातील दुवा अधिक मजबूत केला जाईल.

# निसर्गोपचार आश्रमाचे शारीरिक-मानसिक आरोग्याबरोबरच ग्रामीण विकासातही मोलाचे योगदान- उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन

## उपराष्ट्रपतींच्या उपस्थितीत निसर्गोपचार आश्रमाचा ८१ व्या स्थापना दिवस समारंभ संपन्न

**दैनिक आपला विदर्भ**








**पुणे/प्रतिनिधी:** महात्मा गांधीजींनी स्थापन केलेल्या निसर्गोपचार आश्रमाने केवळ व्यक्तींना शारीरिक-मानसिक आरोग्यच प्रदान केले नाही, तर ग्रामीण विकासातही मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण लोकांशी संस्थेने जोडून घेतलेले नाते आणि त्यांना शाश्वतता व स्वावलंबनाचे धडे देण्यासाठी देण्यात येत असलेले प्रशिक्षण अत्यंत प्रशंसनीय आहे, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

उरुळी कांचन (ता. हवेली) येथील निसर्गोपचार आश्रमाच्या ८१ व्या स्थापना दिवस कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार माऊली उर्फ ज्ञानेश्वर कटके, आश्रमाचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. नारायण हेगडे, वैद्यकीय संचालक आणि विश्वस्त सचिव डॉ. अभिषेक देवीकर, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदीचे मुख्य विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे उपस्थित होते.

उपराष्ट्रपती म्हणाले, उरुळी कांचन या गावात महात्मा गांधीजींनी मणिभाई देसाई, बाळकोबा भावे, श्रीमती गंगाबेन भाटे आणि इतर सहकाऱ्यांच्या मदतीने १९४६ या वर्षी या आश्रमाची स्थापना केली. ही संस्था आता जागतिक स्तरावर सन्मानित होणाऱ्या एका केंद्रात रूपांतरित झाली आहे. या आश्रमाद्वारे मानवतेसाठी दिल्या जाणाऱ्या महान सेवेमुळे आज हे छोटेसे गाव संपूर्ण जगात ओळखले जाते. 'निसर्गोपचार आश्रम' ही एक चळवळ आहे, एक तत्त्वज्ञान आहे आणि गांधीजींच्या कालातीत दृष्टिकोनातून प्रेरित झालेली एक जीवनपद्धती आहे. निसर्ग हाच सर्वश्रेष्ठ उपचारक आहे, असा गांधीजींचा दृढ विश्वास होता. नियमित शारीरिक व्यायाम, मानसिक शांतता आणि निसर्गाशी सुसंगत जीवनशैली स्वीकारण्याची प्रेरणा हा आश्रम आपल्याला देतो, असेही ते म्हणाले.

खरे आरोग्य हे गुंतागुंतीच्या वैद्यकीय उपचारांमध्ये नसून साधेपणा, शिस्त आणि निसर्गाशी सुसंवाद साधून जगण्यामध्ये सामावलेले असते अशी गांधीजींची शिकवण होती. त्यानुसार हा आश्रम निसर्गोपचार, योगसाधना तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेप्रती असलेल्या आपल्या दृढ कटिबद्धतेच्या माध्यमातून हजारो लोकांची सेवा करत आहे. आज संपूर्ण जग जीवनशैलीशी संबंधित आजारांचा सामना करत आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि तणावाशी संबंधित विकार यांचे प्रमाण आज अत्यंत चिंताजनक वेगाने वाढत आहे. आजकाल प्रत्येकजण तणावाचा सामना करत मर्यादित गरजा आणि निसर्गाशी मेळ साधणाऱ्या जीवनशैलीद्वारे त्यावर मात करता येते, असे श्री. राधाकृष्णन म्हणाले.

आरोग्य म्हणजे केवळ रोगाचा अभाव नव्हे, याची हा आश्रम आपल्याला आठवण करून देतो. आरोग्य ही संपूर्ण शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्याची अवस्था होय. साधेपणा, कष्ट आणि प्रामाणिक मार्गाने आपण काम केले, तर आनंद आपोआपच आपल्या मनात प्रवेश करेल आणि आरोग्य चांगले राहील.

आज संपूर्ण जग, आरोग्य आणि स्वास्थ्यासह आधुनिक काळातील विविध आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी आपल्याकडे आशेने पाहत आहे. जागतिक दृष्टिकोन आता बदलला आहे. केवळ पाश्चात्य वैद्यकशास्त्रच सर्वश्रेष्ठ मानले जात होते, तो काळ आता आपण मागे टाकला आहे. आपल्या पारंपरिक उपचारपद्धती आजारांच्या मुळावर उपचार करतात. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली, भारताने आपल्या पारंपारिक वैद्यकीय पद्धती, योग आणि तत्सम सर्वच क्षेत्रांचे पुनरुज्जीवन होत असून त्यांना जागतिक स्तरावरील मान्यता मिळत आहे. भारत आता 'जागतिक वेलनेस पर्यटनाचे' एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास येत आहे. या आश्रमासह देशातील निसर्गोपचार केंद्रांमध्ये आजकाल मोठ्या संख्येने परदेशी पर्यटक उपचारांसाठी आवर्जून येत आहेत. आयुर्वेदिक उपचार, सिद्ध, युनानी उपचारपद्धतींना महत्व आले आहे. आज संपूर्ण जग 'योग दिन' साजरा करत आहे. आपण जेव्हा 'विकसित भारत' या संकल्पनेकडे पाहतो, तेंव्हा त्यासोबतच 'निरोगी भारत' असणेही आपल्यासाठी तितकेच आवश्यक ठरते. या प्रवासात आपल्या आश्रमासारख्या संस्थांची भूमिका अधिकच महत्त्वपूर्ण ठरते. निसर्गोपचार आश्रमाचे प्रयत्न आणि राज्य व केंद्र सरकारचे प्रयत्न यांच्या समन्वयातून होणारे कार्य हे हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने अत्यंत मोलाचे ठरेल, असे उपराष्ट्रपती म्हणाले.

जेव्हा व्यक्ती निरोगी असतात, तेव्हा कुटुंबे बळकट होतात आणि समाजाची भरभराट होते. तसेच राष्ट्राचा उत्कर्षही होतो. अशा वेळी, 'विकसित भारत २०२७' हे उद्दिष्ट त्याही आधी गाठणे शक्य होते. म्हणूनच, आपण सर्वांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे. आपल्या सर्वांकडे संयम असणे आवश्यक आहे. आपण आपले मन नेहमीच एका 'प्रवाही' अवस्थेत ठेवले पाहिजे, जेणेकरून ते अधिकाधिक गोष्टी ग्रहण करू शकेल. 'निसर्गोपचार आश्रमा' ही संस्था पुढील पिढ्यांनाही असेच मार्गदर्शन, उपचार आणि प्रेरणा देत राहो, तसेच संपूर्ण मानवतेला संयमाचा धडा शिकवत राहील असा विश्वासही श्री. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.

डॉ. नारायण हेगडे यांचे 'आनंदाची रहस्ये' हे पुस्तक आनंदी जीवनाविषयी भाष्य करणारे आहे, असे त्यांनी सांगितले.

राज्यपाल श्री. वर्मा म्हणाले, महात्मा गांधी हे निसर्गोपचाराचे महान पुरस्कर्ते होते. स्वातंत्र्याच्या वर्षी ३३ कोटी लोकसंख्येवरून आपण १४० कोटी लोकसंख्या गाठली असून आयुर्मयादा दुप्पट झाली आहे. आपण अन्नाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो आहे. मात्र, अन्नाची गुणवत्ता, विषयुक्त अन्नामुळे जीवनशैलीशी संबंधित आजारांसह अनेक आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. निसर्गोपचार, आयुर्वेद, योगा, युनानी, आधुनिक उपचारपद्धतीं आपला समृद्ध वारसा आहे. निरोगी भारतासाठी निसर्गोपचार महत्वाचे आहेत. समग्र उपचार पद्धती आज महत्वाची असून निसर्ग हा आजारांवरील महान उपचारक आहे, असेही ते म्हणाले. या संदर्भातील महात्मा गांधी यांचे विचार आजही महत्वाचे आहेत असेही राज्यपाल म्हणाले.

निसर्गोपचार आश्रम गेली ८ दशके समाजाची सेवा करीत आहे. पर्यावरण प्रदूषण, व्यसनधीनता आणि अयोग्य आहारामुळे विविध आजार वाढत आहेत. अशा परिस्थितीत देशभरात निसर्गोपचाराचा प्रसार केल्यास रोजगार निर्मिती होण्यासोबत नागरिकांना निरोगी जीवनशैली स्वीकारण्यास प्रोत्साहित करता येईल. विकसित भारताचे स्वप्न निरोगी भारताच्या माध्यमातूनच पूर्ण होऊ शकेल.निसर्गोपचार आश्रमाने विद्यापीठांसोबत समन्वय साधून भारतीय पारंपरिक उपचार पद्धतीचा प्रसार करावा. त्याद्वारे अशा उपचारासाठी कुशल मनुष्यबळ प्राप्त होईल, असे श्री. वर्मा म्हणाले.

शेवटच्या माणसापर्यंत पोहोचणे हे मोठे आव्हान आहे. त्यासाठी हा आश्रम प्रयत्न करत आहे. आश्रमाला परत भेट द्यायला तसेच आश्रमाच्या आदिवासी भागात सुरू असलेल्या कार्याला भेट द्यायला आवडेल असेही राज्यपाल म्हणाले.

राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह म्हणाले, देशाला आत्मनिर्भर बनविण्यात स्वदेशी उपचारपद्धती महत्वाची आहे. त्यामुळे केंद्र सरकारने २०१४ नंतर केंद्र सरकारनेदेखील म.गांधीजींच्या या आश्रमासारख्या प्रयोगांचा विस्तार करण्याच्या कामाला वेग दिला आहे. केंद्राने आयुष मंत्रालयाची स्थापना केली असून प्रत्येक वर्षी मंत्रालयाची आर्थिक तरतूद ४ हजार ४०० कोटीहून अधिक आहे.

जगात रोगोपचार खर्चिक होत असतांना सेवाभाव ही या आश्रमाची विशेषतः आहे. इथली कार्यपद्धती लक्षात घेतल्यास त्यात महात्मा गांधीजींच्या विचारांचा सुगंध दरवळतो आहे असे म्हणता येईल. माती, पाणी, ऊन, हवा या माध्यमांतून या ठिकाणी उपचार होत आहेत. इथली शिस्त इतरांनाही मार्गदर्शक आहे. साधे जीवन, स्वयंशिस्त आणि निसर्गाचा सन्मान करीत गांधीजींना अभिप्रेत असलेली आनंदी जीवनशैली स्वीकारता येईल, असे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, निसर्गोपचार आश्रम केवळ एक आरोग्य केंद्र नसून जीवन जगण्याचा महत्वपूर्ण मार्ग आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या प्रेरणेतून स्थापन झालेला हा आश्रम नैसर्गिक उपचारपद्धतीच्या माध्यमातून आरोग्य, स्वावलंबन आणि साधेपणाच्या जीवनाचा संदेश देतो. केवळ आजारांवरील उपचार नव्हे तर सुदृढ जीवनशैली आणि निसर्गासोबत संतुलन राखण्याची प्रेरणा देखील देत आहे. निसर्ग आणि महात्मा गांधी यांचे अतूट नाते होते. ग्रामीण भागाचा विकास हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. भारताचा खरा आत्मा गावात वसतो, या विचारावर त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणूनच त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात ग्रामीण उन्नती, स्वावलंबन आणि साधेपणाचा मार्ग स्वीकारला आणि समाजासमोर आदर्श निर्माण केला.

निसर्गाच्या सानिध्यात प्रत्येक आजार बरा करण्याची ताकद असते, हा गांधीजींचा संदेश आजही मार्गदर्शक आहे. या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी उरळी कांचन निसर्गोपचार आश्रम येथे पाहायला मिळते. गांधीजींचे हे विचार केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाहीत, तर ते साधेपणा, स्वावलंबन आणि ग्रामीण विकासाचा व्यापक संदेश देणारे आहेत. 'खेड्याकडे चला' हा त्यांचा संदेश आजही तितकाच कालसुसंगत आहे, असेही त्या म्हणाल्या.


डॉ. हेगडे यांनी प्रास्ताविकात आश्रमाची माहिती दिली. ते म्हणाले, राष्ट्रपिता महात्मा गांधी हे याच दिवशी १९४६ येथे आले आणि सहकाऱ्यांच्या मदतीने निसर्गोपचार आश्रम स्थापन केला व स्थानिकांवर निसर्गोपचार केले. येथे आश्रमाचे तत्कालीन संस्थापकांनी आश्रमाच्या विस्तारासाठी प्रयत्न केले. तसेच येथील शेतकऱ्यांसाठी गाईंच्या वंशसुधारासाठी प्रयत्न केले.

यावेळी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त डॉ. देखणे यांनीही मनोगत व्यक्त केले.

यावेळी डॉ. हेगडे लिखित 'आमच्या आनंदाचे रहस्य' अर्थात 'सिक्रेट्स ऑफ आवर हॅपीनेस' या पुस्तकाचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाला आश्रमाचे विश्वस्त, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

## शब्दकोडे क्र. 88



आडवे शब्द

१. राष्ट्रभाषेत शपथ ४. विक्रमवीर सचिनचे आडनाव ८. शिव! शिव! १२. मर्यादा १३. रम्य, सुंदर स्थान १४. राज्यकारभाराचे प्रमुख शहर १६. आंध्रच्या किनाऱ्यालगतचे बंदर १८. उष्ण १९. मला २१. वेळ हिंदीत २३. उघडणे २५. गावातील टवाळ २६. दात २७. कबूतर ३०. वडिलांचा भाऊ ३१. रागाचे मोजमाप! ३२. ओलसर हवा ३४. वाळवी ३७. कायद्याप्रमाणे ३८. पैंजण ३९. ज्ञानेश्वर रचित प्रार्थना ४१. नाजूक ४३. गाडीचे पाय ४४. लागू पडल्यास नेमके औषध वा शब्द ४५. जाड दोर ४६. भूमीचे मार्दव सांगणारी कोंभाची हालचाल ४७. खोलवर नसलेले, वरपांगी ५०. एक अप्सरा ५१. आपमतलबी मंडळी हा देऊन कोहळा काढतात ५२. वसवलेली वस्ती ५५. उदा.हिरा, पाचू इ. प्रकार ५६. वजन, बोजा ५७. सूर्याचे एक नाव ५८. उगीच ६०. नगर, गाव ६२. पवित्र ६३. कौसल्यापुत्र ६५. मार्गस्थ ६६. घरातील मोठी माणसे ६८. पूर्वसूचना न देता ७१. 'कशाला उगाच' असा त्रास ७४. तापापूर्वी येणारे शहारे ७७. युवक ७८. या अभिनेत्रीने 'श्यामची आई' अजरामर केली ७९. जादा कामाचा दिवस!

उभे शब्द

१. खबदाड २. सरळ लांब वासा ३. छेड काढणारा ५. बसल्याजागी लागलेली निद्रा ६. पांढुरका रंग ७. दारूचा एक प्रकार ८. दुर्लक्ष, हेळसांड ९. निच, विश्वासघातकी १०. मातीचा कण ११. मालक १५. पळणे १६. अंजन १७. आडमुठा, हट्टी १९. चौथा हिस्सा २०. वाटाण्याच्या ओल्या शेंगा २१. शासनसंस्था, मंत्रीमंडळ २२. माज २४. भांडणात मध्यस्थी करणारा २५. गवई २७. तेच ते पुन्हा पुन्हा २८. उणीव, कसर २९. चिंतन ३०. मार्जारहत्या घडल्यास ही यात्रा करावी असा शास्त्रार्थ आहे ३१. बाळाचा मुका ३३. मऊशार हरळीसारखे कापड ३५. मिळमिळीत ३६. पृथ्वी ३७. शंकराचे एक नाव ४०. व्यवस्थापन ४१. कोमल, नाजूक, अपक्व ४२. चटकन ४३. एक पालेभाजी ४६. सीतेची जुळी मुले ४७. वाहन नेणे ४८. रममाण, निमग्न ४९. मांडणी ५३. मुलांचा एक बैठा खेळ ५४. घटस्फोट ५६. हमाल ५८. उलट, विरुद्ध ५९. फणसाचा एक प्रकार ६१. शंकर, प्रत्येक ६३. पौर्णिमा ६४. गळ्याभोवतीचे उबदार वस्त्र ६६. पहिला ऋतू ६७. रामबंधु ६९. कोवळी फांदी ७०. डुक्कर ७२. राबता, सवय ७३. दुबळा, गरीब ७५. पावसाची झड ७६. पडसे

### शब्दकोडे क्र. 87 चे उत्तर

आडवे उत्तर

१.रामबाण ४.उभयता ७.गाजरपारखी ११.उशीर १२.गरज १३.जरतर १४.काहूर १५.नभ १८.वाह्यात २०.सरवा २२.मिशा २३.राबडी २४.रीस २५.मिठी २७.रमारम २९.तहहयात ३१अ.दाब ३२.सान ३३.मारवा ३५.माळ ३६.वसाहत ३८.कलागत ३९.कलाकार ४१.चलन ४२.सरडा ४३.वाटचाल ४५.चटकन ४७.नव ४८.नश्वर ५०.कलकलाट ५१.खास ५३.कालव ५४.परतपरत ५७.ललना ५८.दारू ६०.मटका ६१.तडक ६३.रखरख ६४.नागर ६७.बाप ६९.रक्षा ७२.कावरा-बावरा ७४.साखरी ७५.रवाळ ७६.टवाळी ७७.सजा

उभे उत्तर

१.राऊ २.मशी ३.बारकावा ४.उर ५.भाजप ६.तान ७.गाज ८.जरतारी ९.रत १०.पारवा १४.कळ १६.भर १७.खोडी १९.तनमनधन २१.रत्नाकर २४अ.सरबत २५.मित्र २६.देह २८.रमातल २९.तळतळात ३०.हस्तक ३१.तवका ३१अ.दाह ३३.मानस ३४.वाकडा-तिकडा ३५.माव ३७.सारवान ४०.लाटी ४१.चलनवलन ४४.टवका ४५.चटपट ४६.कशात ४९.रवाना ५०.कर्जदार ५१.खार ५२.सतत ५५.रकाना ५६.पगार ५९.रुखरुख ६०.मखर ६२.डरकाळी ६५.गरळ ६६.आरास ६७.बाव ६८.परात ७०.क्षार ७१.खाट ७३.बाजा

# डोणगांवमध्ये उत्साहात रमजान ईद साजरी

## – प्रेम, बंधुभाव आणि एकतेचा संदेश घुमला – शिरखुर्म्याच्या गोडीत वाढली आपुलकीची चव





**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगांव/प्रतिनिधी :** पवित्र रमजान महिन्याची सांगता 'ईद-उल-फितर'च्या आनंदोत्सवाने होताच डोणगांव नगरीत उत्साह, आनंद आणि बंधुभावाचे वातावरण निर्माण झाले. ठिकठिकाणी ईदची नमाज अदा करून मुस्लिम समाज बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा देत सण साजरा केला. ''रमजान महिना हा प्रेम, शांतता, बंधुभाव आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा आहे,'' असे मत ठाणेदार अमरनाथ नागरे यांनी आपल्या शुभेच्छा संदेशातून व्यक्त केले. दि. २१ मार्च रोजी सकाळी ९ ते १० दरम्यान इदगाह, याकुबीया मदरसा, मोहम्मदिया मदरसा, गरीब नवाज मस्जिद परिसरासह विविध ठिकाणी प्रमुख मौलवी आणि आलिम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज अदा करण्यात आली.

नमाजानंतर 'ईद मुबारक'च्या शुभेच्छा देत एकमेकांना आलिंगन देण्याची परंपरा पार पडली, तर दिवसभर मनोमिलनाचे कार्यक्रम रंगले. या आनंदोत्सवात सर्वधर्मीय नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक सलोखा अधिक दृढ केला.

विविध पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि मित्रपरिवाराने मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देत एकतेचा संदेश दिला. दरवर्षीप्रमाणे यंदाही संजीवनी सेवाभावी परिवार आणि शांतता समितीच्या वतीने जामा मस्जिद प्रवेशद्वारावर रात्री ८ वाजता स्नेहबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात ईशाची नमाजानंतर मुस्लिम समाजातील ज्येष्ठ नागरिकांचा पुष्पगुच्छ आणि गुलाब फुल देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी सर्वधर्म समभावाचा संदेश देणारे ह.भ.प. पुंजाजी पळसकर गुरुजी यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमासाठी माजी सभापती राजेंद्र पळसकर, भाजपा नेते अर्जुनराव वानखेडे, माजी सरपंच संजय पाटील आखाडे, सरपंच शिवचरण आखाडे, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी एकत्र येत रमजान ईद विशेष 'शिरखुर्मा'चा आस्वाद घेत आनंदोत्सवाची सांगता केली. डोणगांवमध्ये साजऱ्या झालेल्या या ईद उत्सवाने प्रेम, बंधुभाव आणि एकतेचा संदेश अधिक बळकट करत सामाजिक सलोख्याचा आदर्श निर्माण केला.

## वृत्तविशेष...

### देऊळगावमहीत कुस्त्यांचा थरार





**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** गुढीपाडवा चैत्र उत्सवानिमित्त नंदी महादेव संस्थान टेकडीवर आयोजित पारंपरिक कुस्त्यांच्या दंगलीत यंदाही चित्तथरारक सामने पाहायला मिळाले. राज्यासह हरियाणा, दिल्ली, मध्यप्रदेश आदी भागांतून आलेल्या नामवंत मल्लांनी आपल्या दमदार खेळीने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. अंतिम कुस्तीत हरियाणाचा पवन दहीया आणि नगरचा सागर कोल्हे यांच्यात रंगलेली झुंज विशेष ठरली. दीर्घकाळ चाललेल्या या सामन्यात दोन्ही मल्लांनी जोरदार डावपेच लढवत प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोहोचवली. मात्र सामना अनिर्णित राहिल्याने पंच कमिटीने १५ हजार रुपयांचे बक्षीस दोघांनाही समान विभागून दिले.

या दंगलीत एकूण सुमारे तीन लाख रुपयांची बक्षिसे देण्यात आली. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून क्रीडेकडे वळावे, या उद्देशाने गावकऱ्यांनी या कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या उद्घाटनाला विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. कुस्त्यांचे यशस्वी आयोजन करण्यासाठी पंच कमिटी व गावकऱ्यांनी मोठे योगदान दिले. परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कुस्त्यांचा आनंद घेतला..

### सोमठाणा फाटा प्रवेशद्वार नामकरणावरून आंदोलनाचा इशारा

**दैनिक आपला विदर्भ**

**■ अशोक मुंढे**

**महारचिकना :** लोणार तालुक्यातील गट ग्रामपंचायत सोमठाणा-खापरखेडा अंतर्गत सोमठाणा फाट्यावरील मुख्य प्रवेशद्वाराला ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार, सोमठाणा'' असे नामकरण करावे, यासह विविध मागण्यांसाठी ग्रामपंचायतसमोर आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.

याबाबत सुधाकर वानखेडे यांनी ग्रामपंचायतीला निवेदन दिले असून, संत रविदास महाराज स्मारक व साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे स्मारकासाठी भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे, झोपडपट्टी भागाला ''त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर नगर'' असे नाव देणे, व्यायामशाळेस राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे नाव देणे, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसराचे नामकरण, शिंदी रोडवरील स्मशानभूमीची डागडुजी व सुशोभीकरण, अंगणवाडी इमारतीची दुरुस्ती, तसेच डॉ. आंबेडकर सभागृहाच्या जागेची नोंद दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित चौकास डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असा फलक लावण्याचीही मागणी आहे. दरम्यान, मागण्या मंजूर न झाल्यास आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. यावर प्रतिक्रिया देताना सरपंच सुमित्रा शिंदे यांनी सांगितले की, स्मशानभूमीच्या दुरुस्ती व सौंदर्यीकरणाचे काम प्रस्तावित असून निधी उपलब्ध होताच काम हाती घेतले जाईल. तसेच प्रवेशद्वार व इतर ठिकाणांच्या नामकरणाबाबत दोन्ही गावातील नागरिकांना विश्वासात घेऊन योग्य निर्णय घेतला जाईल.

### शेती महामंडळाच्या जमिनी मूळ वारसांना परत द्या, अन्यथा जेलभरो आंदोलन! शेतकरी संघटनेचा इशारा

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** उच्च न्यायालयाने आदेश देऊनही व मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानंतरही राज्य सरकारने शेती महामंडळाची जमी न अकारीपडीत शेतकऱ्यांना, मूळ वारसांना जमीन वाटपाचा निर्णय घेतला नाही, येत्या १५ दिवसात राज्य सरकारने वाटप केले नाहीतर, जलभरो आंदोलन व त्यानंतर जमिनीवर कब्जा करण्याचे आंदोलन करू, असा ईशारा शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अजित काळे यांनी श्रीरामपूर येथील आंदोलनात बोलताना दिला.

शेती महामंडळाच्या हरिगांव मळा पंचक्रोशीतील शिरसगाव, वडाळा महादेव, ब्राम्हणगांव, ऊंदिरगांव, खैरी निमगांव, खानापूर, माळवाडगांव, मुठेवाडगांव या श्रीरामपूर तालुक्यातील ९ गावातील आकारी पडीत शेतकऱ्यांनी श्रीरामपूर मध्ये आत्मक्लेष आंदोलन केले त्यावेळी अजित काळे बोलत होते. उच्च न्यायालयाने राज्य सरकारला ८ आठवड्यांत म्हणजे ६० दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले, मात्र शासनाने ४ हजार एकर जमीन उद्योगास देण्यासाठी हालचाली सुरू केल्याने आत्मक्लेश आंदोलन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. अजित काळे म्हणाले, सध्या ४ हजार एकर 'झेडआरटू' कंपनीला देण्याचा मुद्दा विधीमंडळाच्या अधिवेशनात गाजतो आहे. विरोधी पक्षाचे वडेट्टीवार यांनी ४ हजार एकर जमीन व त्या जमिनींचे मूल्यांकन सभागृहाचे निदर्शनास आणून दिले. मात्र या जमिनी गोरगरीब कष्टकरी शेतकरी यांच्या आहेत, याबद्दल चकार शब्दही उच्चारला नाही. आम्ही शांततेच्या मार्गाने आंदोलन करत आहोत मात्र आमच्या हक्काच्या जमिनीसंदर्भात स्थानिक आमदार, खासदार, मंत्री कुणीही मदत केली तर त्यांना डोक्यावर घेऊ. मात्र राजकारण केले तर त्यांना बदडून काढू.आत्मक्लेश आंदोलनात महात्मा गांधी यांची प्रतिकात्मक वेशभूषा खानापूर येथील उत्तम शिंदे ( गोसावी) यांनी तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची वेशभूषा टाकळीभानचे कार्लस साठे यांनी वठवली.

## बुलढाण्यात शिवसेनेची ताकद वाढली; चिखलीत भव्य पक्षप्रवेश सोहळा गाजला!

### चिखलीत शिवसेनेचा महास्फोट; शेकडो कार्यकर्त्यांचा भव्य पक्षप्रवेश



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** चिखली विधानसभा मतदारसंघातील राजकारणात मोठी खळबळ उडवणारा शिवसेनेचा भव्य पक्षप्रवेश सोहळा बुलढाणा येथे उत्साहात पार पडला. विविध पक्षांतील शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश करत पक्षाची ताकद लक्षणीय वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले.

शिवसेना मातोश्री जनसंपर्क कार्यालय, बुलढाणा येथे आयोजित या सोहळ्याला मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तसेच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत हा पक्षप्रवेश पार पडल्याचे आयोजकांनी सांगितले.

बुलढाणा नगरपालिका गटनेते मृत्युंजय संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली चिखली मतदारसंघातील विविध पक्षांतील सरपंच, शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख आणि शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

या वेळी नव्याने प्रवेश केलेल्या सर्वांचे स्वागत करत शिवसेनेच्या विचारधारेनुसार जनतेची सेवा करण्याचे आवाहन करण्यात आले. या मोठ्या पक्षप्रवेशामुळे चिखली मतदारसंघातील राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त होत असून शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत झाल्याचे दिसून आले.

## रेल्वेच्या खांबावर चढला, करंट लागून खाली पडला; मुंबईत दोन तास रेल्वेसेवा विस्कळीत

**ठाणे/प्रतिनिधी :** कल्याण रेल्वे स्थानकात एक अज्ञात व्यक्ती ओव्हरहेड वायरच्या खांबावर चढला होता. त्यामुळे, रेल्वे स्थानक परिसरात गोंधळ उडाला, तो जवळपास दोन तास त्या खांबावरच इकडून तिकडे करत होता. या दरम्यान कल्याण रेल्वे स्थानकाच्या एक आणि दोन फलाटावर रेल्वेसेवा विसकळीत झाली होती. अखेर करंट लागल्याने तो खाली पडून गंभीर जखमी झाला आहे. त्यानंतर, रेल्वेतील सुरक्षा रक्षकांनी संबंधित व्यक्तीला मुंबईतील सायन रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या व्यक्तीची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. कल्याण रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एक आणि दोन मधील ओव्हरहेड वायरच्या खांबावर दुपारी दीड वाजण्याच्या सुमारासएक अज्ञात व्यक्ती चढला. रेल्वे आरपीएफ जवान आणि जीआरपी पोलिसांनी त्याला खाली येण्यासाठी विनवणी केली, ते त्याची समजूत काढत होते. मात्र, त्याने एका फलाटावरुन दुसऱ्या फलाटाच्या दिशेने खांबावर चालण्यास सुरुवात केली.

## मेहकरमध्ये राजकीय वाद पेटला

### शिंदे शिवसैनिकाची उबाठा आमदाराला थेट धमकी?

**ओढून मारू वक्तव्याने खळबळ... दोन शिवसैनिकामध्ये वाद उफाळाला...**



**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर शहरात सध्या राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, शिवसेना (शिंदे गट) येथील एका शिवसैनिकाने पत्रकार परिषदेत अत्यंत आक्रमक आणि वादग्रस्त भाषा वापरत उबाठाच्या आमदारालाच थेट धमकी दिल्याचा आरोप समोर आला आहे.

''कोणीही असू द्या, आमदारालाही ओढून मारू,'' असे धक्कादायक वक्तव्य केल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. सदर पत्रकार परिषदेत बोलताना संदीप तट्ठे यांनी आपल्या शिंदे सेनेचे माजी आ संजय रायमुलकर यांच्या कामाचे श्रेय इतरांनी घेऊ नये, अन्यथा गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशारा दिला. ''आमच्यावर आधीच २५-२५ गुन्हे दाखल आहेत, त्यामुळे आम्ही कोणालाही घाबरत नाही,'' असेही त्यांनी स्पष्टपणे म्हटले.

या भडक वक्तव्यामुळे मेहकरमधील राजकीय वातावरण अधिकच तापले असून, विविध पक्षांकडून या वक्तव्याचा निषेध होण्याची शक्यता आहे. तसेच, या प्रकरणी प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे... दरम्यान, या वादग्रस्त वक्तव्याचे पडसाद पुढील काही दिवसांत अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे..

## ५० वर्षाच्या नराधमाने अल्पवयीन मुलीवर केला अत्याचार, परळीत पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. ५० वर्षाच्या नराधमाने अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. दोन वेळा दुकानात बोलावून अत्याचार केल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलीसोबत एका ५० वर्षीय नराधमाने दोनवेळा अत्याचार केल्याची घटना समोर आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पीडित मुलगी ही १० वर्षाची असून ती ५ वी वर्गात शिक्षण घेते. गावातील एका किराणा दुकानदाराने त्याच्या दुकानात बोलावून घेत तिच्यासोबत लैंगिक अत्याचार केला. इतकच नाही तर अशाच प्रकार दोन महिन्यापूर्वी देखील करण्यात आला आणि त्या नंतर त्या नराधमाने अल्पवयीन मुलीला जीवे मारण्याची धमकी दिली. याच कारणामुळे या नराधमाने पुन्हा दोन महिन्यानंतर पीडितेवर अत्याचार केला आहे. यानंतर परळी येथील ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपी बालाजी पांचाळ याच्या विरोधात परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुंबईहून एमडी पुरवठा करणारा तस्कर जेरबंद; ७८ ग्रॅम ड्रग्ज जप्त



**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** शहरातील अमली पदार्थ तस्करीविरोधात गुन्हे शाखेने पुन्हा एकदा ठोस कारवाई करत मुंबईहून थेट पुरवठा करणाऱ्या तस्करासह स्थानिक साथीदाराला रंगेहात अटक केली आहे. लालखडी ते नवसारी मार्गावर एमडी (मॅफेड्रोन) ड्रग्जची डिलिव्हरी सुरू असतानाच पोलिसांनी सापळा रचत ही कारवाई केली. या वेळी आरोपींकडून सुमारे ११ लाख ७९ हजार रुपये किमतीचे ७८ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले.

या प्रकरणात अजिम असद शेख (वय ३६, माहिम वेस्ट, मुंबई) आणि शेख समीर शेख आमीर (वय २५, गवळीपुरा, अमरावती) यांना अटक करण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीत अजिम शेख हा मुंबईहून थेट अमरावतीत एमडीचा पुरवठा करत असल्याचे उघड झाले असून, समीर हा स्थानिक स्तरावर वितरणाची जबाबदारी सांभाळत होता. गुन्हे शाखेने यापूर्वीही ८ फेब्रुवारी रोजी मोठी कारवाई करत चार आरोपींना अटक केली होती. त्या वेळी तब्बल २ किलो ८० ग्रॅम एमडी जप्त करण्यात आली होती. तसेच बडनेरा परिसरात आणखी दोन आरोपींना पकडून त्यांच्या ताब्यातून ७६ ग्रॅम एमडी हस्तगत करण्यात आली होती. या सर्व कारवायांच्या तपासातून मुंबईतील काही युवक अमरावतीत थेट ड्रग्ज पुरवठा करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार अजिम शेख शनिवारी शहरात येऊन एमडीची डिलिव्हरी करणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने लालखडी-नवसारी मार्गावर सापळा रचला. काही वेळातच एक ऑटोरिक्षातून समीर घटनास्थळी पोहोचला आणि दोघे व्यवहार करत असतानाच पोलिसांनी धाड टाकत त्यांना ताब्यात घेतले.

दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणात आणखी काही जणांचा सहभाग असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली असून शहरातील वाढत्या अमली पदार्थ तस्करीवर आळा घालण्यासाठी कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.